# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## ।। सामान्य प्रशासन विभाग।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./७०१ /२०२१ - २२ दि. २२ / ०२ /२०२२

## ।। परिपत्रक ।।

**विषय** :- जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फकुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : मभादि-२०२२/प्र.क्र.९/भाषा-३, दि. १६ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे परिपत्रक जेष्ठ कवी वि. वा शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरवदिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने रविवार दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता **मा.महापौर श्रीम. ज्योत्स्ना जालींदर हसनाळे** यांचे प्रमुख उपस्थितीत मराठी भाषा गौरवदिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन), तिसरा मजला, भाईंदर (प.) येथे आयोजित केलेले आहे.

सदर कार्यक्रमात महानगरपालिका मा. आयुक्त श्री. दिलीप ढोले, मा.उप-महापौर श्री. हसमुख गहलोत, मा. स्थायी समिती सभापती श्री. राकेश शाह, मा. सभागृह नेता श्री. प्रशांत दळवी, मा. विरोधी पक्ष नेता श्री.धनेश पाटील, मा. सभापती महिला व बालकल्याण समिती श्रीम. वंदना मंगेश पाटील, मा. उपसभापती महिला व बालकल्याण समिती श्रीम. सुनिता शशिकांत भोईर, मा. सभापती प्रभाग समिती क्र. १ ते ६, मा.अतिरिक्त आयुक्त-१, मा.अतिरिक्त आयुक्त-२, उपायुक्त (सर्व), शहर अभियंता व कार्यकारी अभियंता (सर्व) यांनी आपला सहभाग घेऊन सहकार्य करावे.

सध्या कोविड-१९ साथीचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे सामाजिक अंतर ठेवून "मराठी भाषा गौरव दिन" साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने पाहता येणार आहे. तरी कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता सहकार्य करावे, ही विनंती.

सदरचा कार्यक्रम Facebook Live पाहण्यासाठी खालील Link वर क्लिक करा.

https://www.facebook.com/MiraBhaindarMunicipalCorporation

(मारूती गायकवाड)
उपायुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका